# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- १७९** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.०७/१०/२०२४ सोमवार रोजी सायंकाळी- ५.०० वाजता झालेली सभा क्र.३१ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.०७/१०/२०२४ सोमवार रोजी सायंकाळी- ५.०० वाजता झालेली सभा क्र.३१ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.०७/१०/२०२४ सोमवार रोजी सायंकाळी- ५.०० वाजता झालेली सभा क्र.३१ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-१८०** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./७२०/२०२४-२५ दि.०९/१०/२०२४
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.०७/१०/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०७/१०/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय
६. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय
७. निविदा समितीचा निर्णय
८. आयुक्त यांची मान्यता

**विषय :-** सार्व.शौचालय साफसफाई कामी अभिकर्ता नेमणूकीसाठी ई-निविदा प्रक्रीयाव्दारे मे.सान्वी मल्टी सर्विसेस लातूर, यांचे L१ प्राप्त दरास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांचा वाचा क्र. २ ते ८ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे सार्व.शौचालय साफसफाई कामी अभिकर्ता नेमणूकीसाठी जा.क्र.आरोग्य वि./४७४/२०२४-२५ दि.०५/०८/२०२४ नुसार जाहिर ई-निविदा सूचना प्रसिध्दीस देऊन दि.२६/०८/२०२४ पर्यंत ई-निविदा मागविण्यात आली असता एकुण २ निविदा प्राप्त झाले होते.

उदयोग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासनाकडील दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील प्रकरण क्रमांक ४ निविदा कालावधीस मुदतवाढ यामधील क्र.४.४.३.१ नुसार निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./५५८/२०२४-२५ दि.२६/०८/२०२४ नुसार दि.०३/०९/२०२४ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती. यामध्ये आणखी २ निविदाकारांनी निविदा सादर केली असे एकुण ४ निविदा प्राप्त झालेत. तदनंतर निविदा समितीच्या मान्यतेनुसार निविदा तांत्रिक लिफाफा क्रं.१ (कागदपत्रांचा) उघडण्यात आला, प्राप्त कागदपत्रांची छाननी केली असता निविदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये अनिवार्य कागदपत्रे सादर केलेली नसल्याचे आढळून आले.

त्यानुसार ज्या निविदाकारांनी अनिवार्य कागदपत्रे सादर केलेले नाहीत ती कागदपत्रे ई-निविदा संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याकरीता त्यांना दि.१६/०९/२०२४, १७:३० वाजेपासून दि.२०/०९/२०२४ १७:३० वाजेपर्यंतची मुदत देण्यात आलेली होती. सदर मुदतीत मागणीनुसार मे.सेवा फाऊडेशन, पुणे यांनी कागदपत्रांची पुर्तता केली. त्यानुसार मे.सान्वी मल्टी सर्विसेस लातूर, आणि मे.सेवा फाऊडेशन, पुणे असे २ निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्याने उदयोग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासनाकडील दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील प्रकरण क्रमांक ४ निविदा कालावधीस मुदतवाढ यामधील क्रं.४.४.३.१. मधील ब. नुसार लिफाफा क्रमांक २(दरांचा) निविदा समितीच्या मान्यतेने उघडण्यात आला.

लिफाफा क्रमांक २(दरांचा) उघडले नंतर प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | दर सादर करण्याचे परिमाण | अंदाजपत्रकीय दर | मे.सान्वी मल्टी सर्विसेस (लातूर) | मे.सेवा फाउडेशन (पुणे) |
|---|---|---|---|---|
| १. | शौचालय साफसफाई प्रती दिन प्रती सिट | २६.६६/- | २१.३३/- L१ | १८७.७५ |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानूसार मे.सान्वी मल्टी सर्विसेस लातूर यांचे दर रु.२१.३३/- सर्वात कमीचे दर उदयोग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासनाकडील दि.०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील प्रकरण क्रमांक ४ निविदा कालावधीस मुदतवाढ यामधील क्र.४.४.३.१. मधील ब. नुसार दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २० टक्के ते (+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. त्यानुसार L१ निविदाकार मे.सान्वी मल्टी सर्व्हिसेस लातुर यांनी सादर केलेले दर रुपये २१.३३/- अंदाजपत्रकीय दर रुपये २६.६६/- प्रति सिट प्रति च्या तुलनेत २०% कमी या मर्यादेत, सुसंगत वाटत आहे. त्यास्तव सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, सार्व.स्वच्छता विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-१८१** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./परिवहन/१९/२०२४ दि.०३/१०/२०२४
३. शहर अभियंता यांचा दि.०३/१०/२०२४ चा अभिप्राय
४. सहाय्यक आयुक्त यांचा दि.०३/१०/२०२४ चा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.०३/१०/२०२४ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०३/१०/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्रशासन पुरस्कृत पीएम ईबस सेवा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मेहरुण शिवार स.क्र.४१८, ४१९ या ठिकाणी बस डेपो तयार करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्रशासन पुरस्कृत पीएम ईबस सेवा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मेहरुण शिवार स.क्र.४१८, ४१९ या ठिकाणी स्थापत्य निगडीत कामांसंदर्भात याअगोदर रक्कम रु.९.६७ कोटी अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी रक्कम रु.८.६९ कोटी रक्कमेस केंद्रीय सुकाणू समितीने १३ व्या बैठकीत मान्यता दिलेली होती. त्याअनुषंगाने ई-निनिवदा सुचना ४९२/२०२४-२५ दि.२४/०७/२०२४ रोजी राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन निविदेप्रक्रियेअंती मक्तेदार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा दराइतकेच दर स्विकारण्यास स्थायी समितीने, प्रशासक ठराव क्र.१४२ दि.१२/०९/२०२४ नुसार मान्यता दिलेली आहे.

तथापि ई-निविदा सुचना ४९२/२०२४-२५ दि.२४/०७/२०२४ मधील अटी व शर्ती कलम ५९ नुसार केंद्रीय सुकाणू समितीने १३ व्या बैठकीत रक्कम रु.९.६७ कोटी अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी रक्कम रु.८.६९ कोटी रक्कमेस मान्यता मिळालेली असली तरी केंद्रीत तांत्रिक सल्लागारांच्या सुचनेनुसार अंदाजपत्रकामधील काही बाबींत सुधारणा आवश्यक असल्याकारणामुळे महानगरपालिकेमार्फत फेरप्रस्ताव केंद्रीय समितीकडेस सादर करण्यात आलेला होता. सदर फेरसादर प्रस्तावास मंजुरी मिळाल्यास पात्र मक्तेदारास फेरसादर दराने काम करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

शहर अभियंता यांचेकडील दि.२४/०७/२०२४ रोजीच्या तांत्रिक मान्यतेनुसार केंद्रीय समितीकडेस प्रस्ताव फेरसादर करण्यात आलेला असुन सदर रक्कम रु.९.९७ कोटी मात्रच्या प्रस्तावापैकी दि.१९/०९/२०२४ रोजी झालेल्या १० व्या बैठकीचे इतिवृत्त (पत्र क्र. K-14011/17/2023-UT-I) नुसार रक्कम रु.९.२१ कोटी मात्रच्या रक्कमेस मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यता देतांना केंद्रीय समितीने एकूण १८% जी.एस.टी. पैकी ९% मात्र जी.एस.टी. विचारात घेतलेला आहे. केंद्रीय समितीने जरी फक्त ९% जी.एस.टी. विचारात घेतलेला असला तरी उर्वरीत ९% जी.एस.टी. बाबत तरतुद कार्यदेशामध्ये समाविष्ठ करुन घेणे आवश्यक आहे. महासभा ठराव क्र.१२८ दि.१९/०७/२०२४ नुसार मंजुर अनुदानापेक्षा जास्तीचा होणारा खर्च मनपा निधीमधून करण्यास मान्यता मिळालेली आहे. दिनांक १९/०९/२०२४ रोजी केंद्र शासनाकडून सदर प्रस्तावास ६०% म्हणजेच रक्कम रु. ५.५३ कोटी मात्र निधी उपलब्ध होणार असुन उर्वरीत ४०% निधी राज्य शासनामार्फत प्राप्त होणार आहे. राज्य सुकाणू समितीच्या दि.२५/०६/२०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने केंद्र शासनाची पुर्व मंजुरी विचारात घेऊन ४०% म्हणजेच रक्कम रु. ३.४८ कोटी मात्र मंजुर केलेला आहे. म्हणजेच रक्कम रु. ०.९६ कोटी रक्कमेबाबत अदयाप राज्य शासनामार्फत पत्र येणे बाकी आहे. राज्य शासन यथावशाक

सदर रक्कमेस मान्यता देईलच तरी काही कारणास्तव सदर रक्कमेस मान्यता न मिळाल्यास सदर खर्च मनपा निधी मार्फत करणे आवश्यक असणार आहे.

शहर अभियंता यांचेकडील दिनांक २४/०७/२०२४ रोजीच्या तांत्रिक मान्यतेनुसार केंद्रीय समितीने अंदाजपत्रक मान्य केलेले असल्याकारणांमुळे त्यानुसार स्थापत्य निगडीत बाबींचे कार्यादेश देणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे विदयुत विभाग व अग्निशमन विभाग या विभागामार्फत संबंधीत कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ झालेली असल्याने सदर बाब स्थायी समितीच्या निदर्शनास असणे आवश्यक असल्याकारणांमुळे प्रस्तावास व त्याअनुषंगाने स्थापत्य निगडीत कामांचे कार्यादेश निर्गमित करुन विदयुत विभाग व अग्निशमन विभाग या विभागांमार्फत त्यांच्या संबंधीत कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविणे कामी मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ३२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-१८२** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था वि./४२/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४
३. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०९/१०/२०२४ चा अभिप्राय
६. आयुक्त यांची मान्यता

**विषय :-** पर्यावरण विभागाकडील NCAP निधी अंतर्गत Dust Suppression vehicle Machine on TATA - Lpt - 912 or Equv. Chasis -01 नग 3000 लिटर क्षमतेचे चेसीस बांधणीस खरेदी करणे कामी ई-निविदा क्र.५२३/२०२४-२५ मधील लिफाफा क्र.०२ मध्ये आलेले न्युनत्मदर (L-१) निविदाकारांचे दर स्विकारण्याबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांचा वाचा क्र. २ व ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पर्यावरण विभागाकडील NCAP निधी अंतर्गत Dust Suppression vehicle Machine on TATA - Lpt - 912 or Equv. Chasis -01 नग 3000 लिटर क्षमतेचे चेसीस बांधणीस खरेदी करणे कामी महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई-निविदा उघडण्याच्या दिनांका पर्यंत एकुण ७ निविदा धारकांनी सहभाग नोंदविलेला आहे.

निविदेमध्ये खालील नमुद केलेल्यानुसार निविदाधारकांनी सहभाग नोंदविलेला आहे.

| अ.क्र. | निविदाधारक कंपनिचे नाव |
|---|---|
| १ | देवी फायर सर्विसेस सोलापुर |
| २ | वाडिया बॉडी बिल्डर्स अहमदाबाद |
| ३ | माऊली ऑटोटेक अंबड (नाशिक) |
| ४ | हिंदुस्तान टेक्नोलॉजी प्रा.लि.जगतपुर (कटक) |
| ५ | उज्वल ऑटोमोटिव्ह प्रा.लि. नाशिक |
| ६ | कॅम ऍव्हेडा इनव्हेरा इंजिनिअर्स, पुणे |
| ७ | मित्रा ॲग्रो इक्यीपमेंट प्रा.लि.अंबड, एम.आय.डी.सी. (नाशिक) |

वर नमुद ०७ निविदाधारकांचे निविदेमध्ये सादर केलेल्या दस्ताऐवजांची प्राथमिक तपासणी विभागामार्फत करण्यात आलेली असुन निविदेमधील तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये नमुद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार सहभागी एकुण ०७ निविदा धारकांचा दस्तऐवज पडताळणी तक्ता विभागामार्फत तयार करण्यात आलेला आहे.

निविदे मधील सहभागी ०७ ही निविदा धारकांचे लिफाफा क्र.१ मध्ये सादर केलेले कागदपत्र अपूर्ण असल्याने ०७ ही निविदाधारक अपात्र होत असुन ०७ ही निविदाधारकांकडुन अपुर्ण असलेले दस्ताऐवज प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याने निविदा समितीच्या समक्ष मान्यतेने निविदेतील अपूर्ण असलेली दस्ताऐवज सादर करणे करीता १ दिवसाचा कालावधी देण्यात आलेला होता.

त्या अनुषंगाने Short Fall अंती निविदाधारकांचे ऑनलाईन प्राप्त दस्ताऐवज वाहन विभागामार्फत Downlod करण्यात येवून पडताळणी तक्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये सहभागी ७ निविदाधारकांपैकी ४ निविदाधारक पात्र झालेले आहेत व ३ निविदाधारक अपात्र झालेले आहेत. निविदेतील पात्र झालेल्या ४ निविदाधारकांचा लिफाफा क्रं.२ निविदा समितीच्या समक्ष मान्यतेने दि.०८/१०/२०२४ रोजी उघडण्यात आलेला असुन निविदेतील सहभागी निविदाकार यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| Sr.No | Bid Number | Bidder Name | Quoted Amount / Evaluated Amount in Rs | % Quoted Below or higher | Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 6162768 | कॅम ऍव्हेडा इनव्हेरा इंजिनिअर्स, पुणे | 4935150/- | -.100 | L 1 |
| 2 | 6134403 | देवी फायर सर्विसेस, सोलापूर | 4985000/- | 0.00 | L 2 |
| 3 | 6140556 | वाडिया बॉडी बिल्डर्स, अहमदाबाद | 5234250/- | 10.500 | L 3 |
| 4 | 6140545 | हिंदुस्तान टेक्नोलॉजी प्रा.लि.जगतपुर (कटक) | 5508425/- | 5.00 | L 4 |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे निविदेतील सहभागी ४ निविदाधारकांपैकी निविदाधारक कॅम ऍव्हेडा इनव्हेरा इंजिनिअर्स, पुणे यांचे निविदेतील प्राप्त दर सर्वात कमीचे असुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमीचे असल्याने स्विकृत करणेस हरकत नसावी. L १ निविदाधारक कॅम ऍव्हेडा इनव्हेरा इंजिनिअर्स, पुणे यांनी निविदेत दिलेले दर रक्कम रु.४९,३५,१५०/- (अक्षरी रक्कम रु. एकोणपन्नास लाख पस्तीस हजार एकशे पन्नास मात्र) च्या खर्चास तसेच L१ निविदाधारक कॅम ऍव्हेडा इनव्हेरा इंजिनिअर्स, पुणे यांना कार्यारंभ आदेश देणेस व करारनामा करुन घेणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**